सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २९५ | शुक्रवार, दि. १७ जुलै २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१
सोने-चांदी
आजचे भाव
२४ सोने ९९.५०% : ₹ १४१४००
२२ सोने ९१.६०% : ₹ १३०१००
१८ सोने ७५.००% : ₹ १०८०००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२५०/-
भाव प्रती १० ग्रॅम




गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!
स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!
जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# स्मार्ट मीटरमुळे जास्त बिलाचा भुर्दंड..?

## 'महावितरण'नेच सांगितला बिल कमी करण्याचा 'हा' सोपा फॉर्म्युला!



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यभरात स्मार्ट मीटर बसविल्यानंतर वीज बिलात अनपेक्षित वाढ झाल्याच्या तक्रारी ग्रामीण आणि शहरी भागातील ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर समोर येत आहेत. अनेक ग्राहकांनी पूर्वीपेक्षा जास्त बिल येत असल्याचा दावा केला असून, यावरून विविध ठिकाणी आंदोलनेही करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर महावितरणने ग्राहकांना वीज बिल कमी ठेवण्यासाठी काही सोप्या उपाययोजना सुचवल्या आहेत. त्याची अंमलबजावणी केल्यास वीज बिल बऱ्यापैकी कमी येऊ शकते, असा दावा करण्यात आला आहे.

महावितरणच्या माहितीनुसार स्मार्ट मीटर हे केवळ वीज वापराची अचूक नोंद करणारे उपकरण असून, बिलाचा आकार पूर्णपणे ग्राहकाच्या वीज वापरावर अवलंबून असतो. त्यामुळे वीज बचतीच्या सवयी अंगीकारल्यास बिलात लक्षणीय घट होऊ शकते. स्मार्ट मीटरमुळे ग्राहकांना मोबाईल ॲप किंवा ऑनलाइन प्रणालीद्वारे स्वतःचा वीज वापर रिअल-टाइममध्ये पाहता येतो. त्यामुळे दररोज किती वीज वापरली जात आहे, यावर लक्ष ठेवून गरजेनुसार वापर नियंत्रित करता येतो आणि महिनाअखेर येणारे बिल कमी करण्यास मदत होते. यासाठी टाईम ऑफ डे (टीओडी) योजनेचा लाभ घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### स्मार्ट मीटर मोफत; सहकार्याचे आवाहन

**महावितरणकडून बसविण्यात येणारे स्मार्ट टीओडी मीटर पूर्णपणे मोफत असून ते प्री-पेड नसून पोस्टपेड आहेत. त्यामुळे ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच वीज वापरल्यानंतरच वीज बिल मिळते. स्मार्ट मीटरबाबत गैरसमज करून घेण्यापेक्षा ग्राहकांनी टीओडी योजनेचा लाभ घेण्यावर भर द्यावा. दिवसा उपलब्ध असलेल्या सवलतीच्या दराचा जास्तीत जास्त वापर करून वीज बिलात बचत करता येऊ शकते. त्यामुळे ग्राहकांनी स्मार्ट टीओडी मीटर बसविण्यास सहकार्य करावे आणि सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत अधिक वीज लागणारी उपकरणे वापरून शासनाच्या सवलतीचा अधिकाधिक लाभ घ्यावा. त्यामुळे वाढीव वीज बिलाची समस्या काही प्रमाणात कमी करण्यास मदत होईल, असे महावितरणच्या जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता आय. ए. मुलाणी यांनी म्हटले आहे.**

**दिवसा वीज वापरावर प्रति युनिट सवलत**

राज्यात सौरऊर्जेसारख्या नवीकरणीय ऊर्जेचे उत्पादन वाढत असल्याने दिवसा उपलब्ध होणारी वीज तुलनेने स्वस्त आहे. त्यामुळे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार घरगुती ग्राहकांसाठी टाईम ऑफ डे (टीओडी) पद्धतीनुसार वीजदर लागू करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना प्रति युनिट सवलत दिली जाते. जुलै २०२५ पासून घरगुती ग्राहकांना या सवलतीचा लाभ मिळत आहे. सुरुवातीला प्रति युनिट ८० पैशांची सवलत देण्यात आली होती. सध्या ही सवलत ८५ पैसे प्रति युनिट असून, पुढील काही वर्षांत ती आणखी वाढविण्यात येणार आहे.

**जळगाव परिमंडलात ५.६२ कोटींची सवलत**

महावितरणच्या जळगाव परिमंडलातील तीन लाख ७३ हजार ६२० ग्राहकांना जुलै २०२५ ते जून २०२६ या कालावधीत तब्बल ५ कोटी ६२ लाख ६० हजार रुपयांची सवलत वीज बिलात मिळाली आहे. यात जळगाव, धुळे आणि नंदुरबार या तीनही मंडळांतील ग्राहकांचा समावेश आहे. स्मार्ट टीओडी मीटरमुळे ग्राहकांना मोबाईलवर तासागणिक वीज वापराची माहिती उपलब्ध होत असल्याने कोणत्या वेळी किती वीज वापरली जात आहे, यावर लक्ष ठेवता येते. त्यानुसार वॉशिंग मशीन, गिझर, एअर कंडिशनर, मायक्रोवेव्ह ओव्हन, इस्त्री तसेच इतर जास्त वीज वापरणारी उपकरणे शक्यतो सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वापरल्यास वीज बिलात बचत होऊ शकते.



*अमळनेर : ललगुण (ता. खटाव, जि. सातारा) येथील मूळ रहिवासी व भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागातील निवृत्त वैज्ञानिक शिवदास धर्माधिकारी यांनी गुरुवार, दि. १६ जुलै रोजी श्री मंगळग्रह मंदिरात येऊन दर्शन घेतले. त्यांचा मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सत्कार करताना ग्रीनरी कन्सल्टंट सुबोध पाटील, सतीश मोरे, सुरक्षा रक्षक हेमंत पवार, स्वप्नील शिरसाठ, जनसंपर्क अधिकारी शरद कुलकर्णी. (छायाचित्र : मयूर चौधरी)*

# सर्पदंशाचा वाढला धोका; सात हजार लसींचा रुग्णालयांत साठा


## गेल्या दीड महिन्यात जिल्ह्यातील १२५ जणांना सर्पदंश झाल्याचे उघड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पावसाळ्यात पाणी बिळात शिरल्यामुळे साप सुरक्षित जागेच्या शोधात मानवी वस्त्यांकडे किंवा शेतांतील घरांमध्ये धाव घेत असल्याने सर्पदंशाचा धोका वाढला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा आरोग्य विभागाने सर्पदंशावरील लसींचा (इंजेक्शन) साठा वाढविला आहे. जून ते सप्टेंबर या कालावधीत सर्पदंशाच्या घटना वाढत असल्याने जिल्हा रुग्णालयासह सर्व ग्रामीण रुग्णालयांमध्ये एकूण सहा हजार ९५५ सर्प प्रतिबंधक लसींचा पुरवठा करण्यात आला आहे.

जून ते जुलै महिन्याच्या १५ तारखेपर्यंत १२५ जणांना सर्पदंश झाल्याचे चित्र आरोग्य विभागाच्या आकडेवारीवरून समोर आले आहे. चोपडा व यावल तालुक्यांतील अनेक गावे जंगलाला लागून किंवा जंगलाच्या कुशीतच आहेत. पावसाळा सुरू झाल्याने ग्रामीण भागात घरांच्या सभोवताली मोठ्या प्रमाणात गवत आणि झाडी वाढली आहे. या गवतातून साप थेट लोकांच्या घरांमध्ये किंवा गोठ्यांमध्ये प्रवेश करतात. शेतात काम करतानाही सर्पदंशाचा धोक वाढतो. यामुळे लस सज्ज ठेवल्या आहेत.

> ***"प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात आणि आरोग्य केंद्रात सर्पदंशावरील इंजेक्शन उपलब्ध आहेत. सर्पदंश झालेल्या व्यक्तीला मांत्रिकाकडे नेऊन वेळ वाया घालवू नका. रुग्णास तत्काळ रुग्णालयात भरती करा.***
> ***- डॉ. सचिन भायेकर, जिल्हा आरोग्याधिकारी, जळगाव.***



**मांत्रिकाची नव्हे; तर रुग्णालयाची गरज**

जिल्ह्यातील दुर्गम आणि आदिवासी भागात अजूनही नागरिकांमध्ये अंधश्रद्धा कायम असल्याचे पाहायला मिळते. सर्पदंश झाल्यानंतर ग्रामीण भागातील नागरिक घाबरून रुग्णाला डॉक्टरांकडे नेण्याऐवजी गावातील मांत्रिकाकडे घेऊन जातात. मंत्र-तंत्र किंवा जडीबुटीच्या नादात वेळ वाया जातो आणि योग्य उपचारांअभावी रुग्णाचा मृत्यू होतो. सापाचे विष शरीरात पसरण्यापूर्वी वैद्यकीय उपचार मिळणे गरजेचे आहे. याबाबत समाजात मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याची नितांत गरज निर्माण झाली आहे.

**लक्षणे दिसताच तातडीने रुग्णालयात आणा**

सर्पदंश झालेल्या व्यक्तीला घाबरू न देता धीर देणे अत्यंत आवश्यक आहे. ज्या हाताला किंवा पायाला दंश झाला असेल त्या भागाची जास्त हालचाल करू नये. रुग्णाला त्वरित जवळच्या शासकीय रुग्णालयात दाखल करावे. खासगी वाहनाचा आधार न मिळाल्यास १०८ या रुग्णवाहिका सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# धुळे रोडवर गतिरोधकांच्या अभावामुळे विजय शॉपीनजीक वाढला अपघातांचा धोका

## बाजार समिती ते आर. के. नगरदरम्यान तातडीने गतिरोधक बसविण्याची मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील धुळे रोडवरील कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरापासून आर. के. नगरपर्यंतच्या रस्त्यावर एकही गतिरोधक नसल्याने भरधाव वाहनांचा वेग दिवसेंदिवस वाढत असून अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. विशेषतः विजय शॉपीनजीक वळण कॉलनी परिसर असल्याने मोठी वर्दळ असल्याने या ठिकाणी तातडीने गतिरोधक बसविण्यात यावेत, अशी मागणी स्थानिक व्यावसायिक व नागरिकांनी केली आहे.



विजय शॉपीच्या आजूबाजूला अनेक निवासी कॉलन्या असून, नागरिकांची सतत ये-जा सुरू असते. या भागातील नागरिकांना नेहमी रस्ता ओलांडावा लागतो. दोन्ही बाजूस शॉपिंग कॉम्प्लेक्स व समोर शॉपी असल्याने खरेदी-विक्रीसाठीही मोठ्या संख्येने ग्राहक या परिसरात येत असतात. मात्र, या भागात कोणतेही गतिरोधक किंवा वेग नियंत्रणाची व्यवस्था नसल्याने दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहने सुसाट धावत असल्याचे चित्र आहे.

सायंकाळी वाहतुकीचे प्रमाण वाढल्यानंतर रस्त्यावरून वळण घेणाऱ्या वाहनांना समोरून येणाऱ्या भरधाव वाहनांचा अंदाज येत नाही. त्यामुळे अनेकदा वाहने समोरासमोर येऊन धडकण्याच्या घटना घडतात. काही वेळा पादचारी आणि ज्येष्ठ नागरिकांनाही जीव मुठीत धरून रस्ता ओलांडावा लागत असल्याची परिस्थिती आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार या भागात लहान-मोठे अपघात वारंवार घडत असून, मोठी दुर्घटना घडण्यापूर्वीच सार्वजनिक बांधकाम विभाग व संबंधित प्रशासनाने विजय शॉपी परिसरात तसेच आवश्यक ठिकाणी गतिरोधक उभारावेत, वेगमर्यादेचे फलक लावावेत आणि वाहतूक सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना तातडीने कराव्यात.



*अमळनेर : शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील एलआयसी कॉलनीच्या मोकळ्या भूखंडावर पतंजली योग समितीतर्फे महिलांसाठी दररोज मोफत योग वर्ग सुरू करण्यात आला आहे. या वर्गात सहभागी झालेल्या महिला.*

# साने गुरुजी कन्या हायस्कूलमध्ये राजभाषा हिंदी ऑलिम्पियाड परीक्षा

## १२० विद्यार्थिनींचा सहभाग; हिंदी भाषेच्या प्रचार-प्रसाराचा संदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील साने गुरुजी कन्या हायस्कूलमध्ये महात्मा गांधी राजभाषा हिंदी प्रचार संस्था, पुणे यांच्या वतीने आयोजित राजभाषा हिंदी ऑलिम्पियाड परीक्षा उत्साहात पार पडली. या परीक्षेत शाळेतील एकूण १२० विद्यार्थिनी सहभागी झाल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव संदीप घोरपडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष ॲड. कौस्तुभ पाटील उपस्थित होते.

मुख्याध्यापिका अनिता बोरसे यावेळी व्यासपीठावर होत्या. त्यांनी विद्यार्थिनींचे कौतुक करताना सांगितले, की विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभाग घेऊन विद्यार्थिनी शाळेचे नाव उज्ज्वल करत आहेत. हिंदी ऑलिम्पियाडसारख्या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमध्ये भाषेची आवड निर्माण होऊन हिंदीच्या प्रचार-प्रसाराला चालना मिळते. प्रमुख पाहुणे ॲड. कौस्तुभ पाटील यांनी विद्यार्थिनींना दररोज महान व्यक्तींच्या चरित्रातील किमान १५ पाने वाचण्याचा तसेच आठवड्यातून एक पुस्तक वाचून त्यातील विचार आत्मसात करण्याचा सल्ला दिला. प्रताप महाविद्यालयाचे हिंदी विभागप्रमुख डॉ. प्रा. कुमावत यांनी दूरध्वनीद्वारे विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. अध्यक्ष संदीप घोरपडे यांनी हिंदी ऑलिम्पियाड परीक्षेचे महत्त्व विशद करत विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील तसेच

पान २ वर

# पतंजली योग समितीतर्फे महिलांसाठी मोफत योग वर्ग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : शहरातील प्रभाग क्रमांक ८ मधील एलआयसी कॉलनीच्या मोकळ्या भूखंडावर पतंजली योग समितीतर्फे महिलांसाठी दररोज मोफत योग वर्ग सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमाला परिसरातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, सध्या ३५ महिला नियमितपणे योगाभ्यासाचा लाभ घेत आहेत.

सध्या महिलांमध्ये कर्करोग, हृदयरोग, सांधेदुखी, थायरॉईड आदी विविध आजारांचे प्रमाण वाढत आहे. दैनंदिन धावपळ, घरगुती जबाबदाऱ्या आणि व्यस्त जीवनशैलीमुळे अनेक महिलांना नियमित व्यायाम किंवा सकाळी फिरण्यासाठी वेळ मिळत नाही. ही बाब लक्षात घेऊन महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहावे, या उद्देशाने महिला पतंजली योग समितीने हा मोफत योग वर्ग सुरू केला आहे. दररोज पहाटे ५.१५ ते ६.१५ या वेळेत योग समितीच्या अमळनेर तहसील प्रभारी कामिनीताई पवार, कोषाध्यक्षा रत्नाताई भदाणे, मीडिया प्रभारी माधुरीताई पाटील आणि अलकाताई पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली योग प्रशिक्षण दिले जात आहे.

या उपक्रमासाठी नगरसेविका अपूर्वाताई चौधरी आणि जालंदर चौधरी यांनी एलआयसी कॉलनीसाठी दोन योग मॅट उपलब्ध करून दिल्या आहेत. मोफत योग वर्गाच्या यशस्वी आयोजनासाठी महिला पतंजली योग समिती आणि एलआयसी कॉलनीतील नागरिकांचे सहकार्य लाभत आहे. समितीने अधिकाधिक महिलांनी या मोफत योग वर्गाचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

## संपादकीय

# दु:खांना नीट समजून घ्या, त्यांची भाषा ओळखा

'दु:ख' हा शब्द ऐकला की अनेकांच्या मनात भीती, निराशा किंवा असहाय्यतेची भावना निर्माण होते. आपण आयुष्यभर आनंदाच्या शोधात धावत असतो. पण दु:ख आले की ते शक्य तितक्या लवकर दूर करण्याचा प्रयत्न करतो. मात्र मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान या दोन्ही शाखा एक महत्त्वाची गोष्ट सांगतात– दु:ख हे केवळ वेदना नसते; ते आपल्या मनाचा एक संदेश असतो. त्या संदेशाची भाषा समजली, तर दु:ख आपल्याला मोडत नाही, तर घडवत जाते. मानसशास्त्रानुसार प्रत्येक भावना आपल्या गरजा, मूल्ये आणि अनुभव यांच्याशी जोडलेली असते. जसे शरीरात वेदना झाली तर ती शरीरातील एखाद्या समस्येचा इशारा असते, तसेच मनातील दु:खही आपल्या भावनिक जगातील एखाद्या अपूर्ण गरजेची जाणीव करून देते. त्यामुळे दु:खाशी लढण्यापेक्षा त्याला समजून घेणे अधिक महत्त्वाचे ठरते. आजच्या काळात अनेक लोक दु:ख लपवण्याचा प्रयत्न करतात. सोशल मीडियावर सतत आनंदी दिसण्याची स्पर्धा असल्यामुळे अनेकांना वाटते की दु:खी असणे म्हणजे कमजोरी. पण वास्तव वेगळे आहे. संशोधनातून असे दिसून आले आहे की आपल्या भावनांना स्वीकारणारे आणि त्यांच्याबद्दल प्रामाणिक असणारे लोक मानसिकदृष्ट्या अधिक सक्षम असतात.

दु:खाची भाषा अनेक प्रकारची असते. कधी ते सांगते, 'तू खूप थकला आहेस.' कधी म्हणते, 'तू स्वत:कडे दुर्लक्ष करत आहेस.' कधी ते कुजबुजते, 'तुला कोणाशी तरी मन मोकळे करायचे आहे.' आणि कधी ते स्पष्ट सांगते, 'हा मार्ग तुझ्यासाठी योग्य नाही.' समजा एखादा विद्यार्थी परीक्षेत नापास झाला. त्याला वाटते की त्याचे आयुष्य संपले. पण जर तो आपल्या दु:खाची भाषा समजून घेतली, तर त्याला कळेल की हे दु:ख त्याच्या अपयशामुळे नाही, तर त्याच्या अपेक्षा आणि वास्तव यांच्यातील अंतरामुळे निर्माण झाले आहे. ते दु:ख त्याला अधिक चांगली तयारी करण्याची प्रेरणा देऊ शकते. दुसरे उदाहरण पाहू. एखादे नाते तुटते. सुरुवातीला मनाला प्रचंड वेदना होतात. अनेकांना वाटते की ही वेदना कधीच संपणार नाही. पण त्या दु:खामागे अनेक प्रश्न दडलेले असतात. मी स्वत:ला विसरलो होतो का? मी सतत समोरच्यालाच आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करत होतो का? मी स्वत:च्या गरजांकडे दुर्लक्ष केले का? अशा प्रश्नांची उत्तरे मिळू लागली की दु:ख हळूहळू शिक्षक बनते. तत्त्वज्ञान देखील याच दिशेने मार्गदर्शन करते. अनेक भारतीय संतांनी आणि तत्त्वज्ञांनी सांगितले आहे की जीवनात सुख आणि दु:ख हे दोन्ही तात्पुरते आहेत. कोणतीही अवस्था कायम राहत नाही. म्हणून दु:खाला शत्रू न मानता, जीवनाचा एक भाग म्हणून स्वीकारल्यास मन अधिक स्थिर होते. दु:खाची भाषा ओळखण्यासाठी स्वत:शी संवाद साधणे आवश्यक आहे. स्वत:ला काही साधे प्रश्न विचारा. मला नेमके कशामुळे दु:ख होत आहे? मी कोणती अपेक्षा धरून बसलो होतो? माझ्या कोणत्या गरजा पूर्ण होत नाहीत? मी कोणत्या गोष्टीवर नियंत्रण ठेवू शकतो आणि कोणत्या गोष्टी स्वीकाराव्या लागतील? अशा प्रश्नांमुळे मनातील धुकं हळूहळू दूर होऊ लागते.

मानसशास्त्रात याला भावनिक जागरूकता म्हणतात. जे लोक स्वत:च्या भावनांना योग्य नाव देऊ शकतात, त्यांच्यामध्ये तणाव कमी असतो आणि निर्णयक्षमता अधिक चांगली असते. कारण भावना दडपल्याने त्या नाहीशा होत नाहीत; त्या वेगळ्या स्वरूपात पुन्हा समोर येतात. एक छोटेसे उदाहरण घ्या. एका झाडाची पाने सतत कोमेजत होती. माळी रोज त्या पानांवर पाणी शिंपत होता, पण काहीच फरक पडत नव्हता. शेवटी त्याने मुळांना पाणी दिले आणि झाड पुन्हा हिरवेगार झाले. आपल्या दु:खाचेही असेच आहे. फक्त बाह्य परिस्थिती बदलण्यापेक्षा मनाच्या मुळाशी जाऊन कारण समजून घेतले, तर खरा बदल घडतो. दु:ख आपल्याला संयम शिकवते. ते आपल्याला इतरांच्या वेदना समजण्याची संवेदनशीलता देते. अनेक महान कलाकार, लेखक आणि विचारवंत यांच्या उत्कृष्ट निर्मितीमागे त्यांच्या दु:खाचा मोठा वाटा होता. त्यांनी दु:खाला शाप न मानता, सर्जनशीलतेची ऊर्जा बनवली. याचा अर्थ असा नाही की प्रत्येक दु:ख एकट्याने सहन करावे. जर दु:ख दीर्घकाळ टिकत असेल, दैनंदिन जीवनावर परिणाम करत असेल किंवा निराशा वाढवत असेल, तर विश्वासू व्यक्ती, कुटुंबीय किंवा मानसिक आरोग्य तज्ज्ञांची मदत घेणे हे शहाणपणाचे पाऊल आहे. शेवटी लक्षात ठेवा–दु:ख हे तुमच्या आयुष्याचे अंतिम सत्य नाही. ते एक पत्र आहे, जे तुमच्या मनाने तुम्हालाच लिहिलेले असते. त्या पत्रातील शब्द समजून घेतले, तर दु:ख हळूहळू मार्गदर्शक बनते. जेव्हा आपण दु:खाची भाषा ओळखायला शिकतो, तेव्हा आपण फक्त दु:खातून बाहेर पडत नाही, तर स्वत:ला अधिक खोलवर ओळखू लागतो.

## साने गुरुजी कन्या हायस्कूलमध्ये राजभाषा हिंदी ऑलिम्पियाड परीक्षा

**पान १ वरून :** सर्व संचालक मंडळाने परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या. परीक्षेसाठी हिंदी विषयाचे शिक्षक दिलीप पाटील यांनी मार्गदर्शन केले. ज्येष्ठ शिक्षक जे. एस. पाटील, आर. एम. देशमुख, मुकेश पाटील आणि दीपक महाजन यांनी सहकार्य केले. दिलीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. मुकेश पाटील यांनी आभार मानले.

# देशाच्या भौगोलिक मध्यवर्ती स्थानामुळे 'भारताचे हृदय' जळगाव

## पर्यटन विकासासाठी पत्रकारांचे 'जैन हिल्स'वर विचार मंथन




*अमळनेर : जळगावातील जैन हिल्सवरील सुधीर बोस सभागृहात रविवार, दि. १२ जुलै रोजी झालेल्या जिल्ह्यातील पर्यटन, इतिहास, अध्यात्म, साहित्य आणि सांस्कृतिक वारसा यांचा प्रचार व प्रसार कसा करता येईल, यावर चर्चासत्र झाले. याप्रसंगी ज्येष्ठ पत्रकार डॉ. डिगंबर महाले यांचा सत्कार करताना जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र ठाकूर. शेजारी जैन इरिगेशनचे देवेंद्र पाटील, ज्येष्ठ पत्रकार दिलीप तिवारी, राजेश यावलकर व शेखर पाटील. समोर उपस्थित पत्रकार बांधव.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : देशाच्या भौगोलिक मध्यवर्ती स्थानामुळे जळगावला 'भारताचे हृदय' असे संबोधले जाते. येथून देशातील बहुतांश राज्यांशी सहज दळणवळण शक्य होत असल्याने पर्यटन विकासाच्या दृष्टीने जळगाव जिल्ह्याला मोठी संधी उपलब्ध आहे. या पार्श्वभूमीवर जळगावातील जैन हिल्सवरील सुधीर बोस सभागृहात जिल्ह्यातील पर्यटन, इतिहास, अध्यात्म, साहित्य आणि सांस्कृतिक वारसा यांचा प्रभावी प्रचार–प्रसार कसा करता येईल, यावर माध्यम क्षेत्रातील ज्येष्ठ पत्रकार आणि तालुका प्रतिनिधींसमवेत सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत जिल्हा माहिती अधिकारी रवींद्र ठाकूर यांनी जिल्ह्यातील पर्यटनवृद्धीसाठी प्रशासनाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यटनस्थळांचा विकास, त्यांची व्यापक प्रसिद्धी आणि पर्यटकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीत आपले गाव, आपला तालुका आणि आपला जिल्हा याकडे पर्यटनाच्या दृष्टीने कसे पाहावे, यावर विचार मंथन झाले. प्रत्येक गावाचा इतिहास, पौराणिक संदर्भ, धार्मिक व आध्यात्मिक महत्त्व, साहित्यिक आणि सांस्कृतिक वारसा, पर्यटनस्थळांपर्यंत पोहोचण्यासाठीची दळणवळण व्यवस्था तसेच त्या ठिकाणांची वैशिष्ट्ये यांची माहिती एकत्रित करून प्रभावी स्वरूपात लोकांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली.

खानदेशाच्या समृद्ध इतिहासावर भाष्य करताना ज्येष्ठ पत्रकार डॉ. दिलीप तिवारी यांनी प्रभू श्रीरामचंद्रांचा खानदेशाशी असलेला संदर्भ, जिल्ह्यातील प्राचीन धार्मिक स्थळे, ऐतिहासिक किल्ले, भुईकोट किल्ले, गढ्या, तटबंदी आणि ऐतिहासिक वारसा यांची माहिती दिली. या सर्व स्थळांचे प्रभावी संवर्धन आणि प्रसिद्धी झाल्यास खानदेश देशाच्या पर्यटन नकाशावर अधिक ठळकपणे झळकू शकतो, असे त्यांनी नमूद केले.

पत्रकार शेखर पाटील यांनी डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील मंदिरे, पर्यटनस्थळे आणि ऐतिहासिक वारसा जागतिक स्तरावर पोहोचविण्याचा प्रस्ताव मांडला. विविध पर्यटनस्थळांची माहिती, छायाचित्रे, व्हिडिओ, इतिहास आणि प्रवास मार्गदर्शन एकाच डिजिटल व्यासपीठावर उपलब्ध करून दिल्यास देश–विदेशातील पर्यटकांना जळगाव जिल्ह्याची प्रभावी ओळख होईल, असे सांगितले.

या चर्चासत्राला ज्येष्ठ पत्रकार राजेश यावलकर, प्रा. बी. एन. चौधरी, श्रीकांत जोशी, अरुण पाटील, पुरुषोत्तम गड्डम, डॉ. दिलीप वैद्य, सतीश चौधरी, हेमंत पाटील, संजय पवार, डॉ. डिगंबर महाले, जिजाबराव वाघ, आल्हाद जोशी, संजय सोनवणे, राजेंद्र पाटील यांच्यासह जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील पत्रकार उपस्थित होते. या चर्चासत्राच्या यशस्वी आयोजनासाठी जैन इरिगेशनचे देवेंद्र पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष सहकार्य केले. यावेळी श्री. ठाकूर यांनी उपस्थित पत्रकारांना अधिकृत नियुक्तीपत्र दिले.

# नव उद्योजकांनो सावधान!

**'ही' एक चूक तुमचा करोडोंचा स्टार्टअप एका झटक्यात बुडवू शकते!**

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चाणक्यांनी एका सामान्य तरुण चंद्रगुप्ताला भारताचा सर्वांत महान सम्राट बनवले होते. जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल, तर चाणक्यांनी सांगितलेली ही ५ कटू सत्ये तुम्हाला नक्कीच मदत करतील.

आजच्या काळात आपला स्वत:चा स्टार्टअप सुरू करणे अनेक तरुणांचे स्वप्न आहे. पण मित्र–मैत्रिणींनो, एक बिझनेसमन होणे काही लहान मुलांचा खेळ नाही. त्यासाठी तुम्हाला एकाच वेळी अनेक गोष्टी सांभाळाव्या लागतात; जसे की, योग्य स्ट्रॅटेजी तयार करणे, व्यवसायासाठी पैसा उभा करणे आणि संपूर्ण टीमचे नेतृत्व करणे. जेव्हा रोज नवे निर्णय घ्यावे लागतात, तेव्हा मेंदू सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. अशा व्यवसायात योग्य दिशा दाखवण्यासाठी आचार्य चाणक्य यांच्यापेक्षा चांगला गुरू दुसरा कोणी असू शकत नाही.

चाणक्यांनी एका सामान्य तरुण चंद्रगुप्ताला भारताचा सर्वात महान सम्राट बनवले होते. जर तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करण्याचा विचार करत असाल, तर चाणक्यांनी सांगितलेली ही ५ कटू सत्ये तुम्हाला नक्कीच मदत करतील.

**१) आपले प्लॅनिंग नेहमी गुप्त ठेवा**

व्यवसायाचा पहिला नियम आहे, की तुमचे पुढचे पाऊल काय असेल याची कोणालाच कल्पना येऊ देऊ नका. जसे एखादा जादूगार आपली जादू दाखवण्यासाठी पहिली ट्रिक कोणालाही सांगत नाही, तसेच तुम्हालाही करायचे आहे. जोपर्यंत तुमचे प्लॅनिंग पूर्ण होत नाही तोपर्यंत ते गुप्त ठेवा. जर तुम्ही उत्साहाच्या भरात तुमचे सीक्रेट प्लॅन शेअर केले, तर मार्केटमधील तुमचे विरोधक त्याचा फायदा घेऊ शकतात. यामुळे तुमच्या कित्येक महिन्यांच्या मेहनतीवर पाणी फिरू शकते; त्यामुळे काम होईपर्यंत गुप्तता बाळगा.

**२) रोज काहीतरी नवीन शिकण्याची संधी गमावू नका**

आचार्य चाणक्य सांगतात, की यशस्वी व्यक्ती होण्यासाठी शिकणे कधीही थांबवू नये. व्यक्ती श्रीमंत कुटुंबात जन्मलेली असो वा गरीब, हा नियम सर्वांना समान लागू होतो. दररोज काहीतरी नवीन शिकले पाहिजे, अगदी लहानसहान गोष्ट असली तरीही. आज जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेले इलॉन मस्क आणि वॉरन बफे दररोज तासनतास पुस्तके वाचतात आणि नवीन गोष्टी शिकतात.

**३) चुकीचा पार्टनर निवडणे पडू शकते भारी**

व्यवसायामध्ये तुम्हीच सर्वकाही करू शकत नाही. तुम्हाला लोकांची साथ आणि मदतीची गरज पडते; पण येथेच खरी कसरत असते की तुम्ही तुमचा पार्टनर कोणाला निवडता. चाणक्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे, की एक चुकीचा आणि धोकेबाज जोडीदार एखाद्या शत्रूपेक्षाही धोकादायक असतो. शत्रूचा सामना तुम्ही करू शकता कारण ते तुमच्या समोर असतात, पण तुमच्या आसपासच्या लोकांमध्ये दडलेला गद्दार तुमच्या पाठीत खंजीर खुपसतो. त्यामुळे तुम्ही कंपनीमध्ये कोणाला उच्च पदावर ठेवता आणि कोणाला व्यवसायात जोडीदार बनवता, त्यांच्यावर डोळे मिटून विश्वास ठेवू नका.

**४) गरज पडल्यास कडक पावले उचलणे गरजेचे**

जेव्हा तुम्ही कंपनी चालवता तेव्हा कित्येकदा अशी परिस्थिती येते जेथे तुम्हाला एक कडक बॉस व्हावे लागते. सहकाऱ्यांना आणि काम करणाऱ्यांना कधी–कधी खडे बोल ऐकवावे लागतात. अशा स्थितीत जास्त चांगुलपणाने वागल्यामुळे तुमचे नुकसान होऊ शकते. चाणक्य एक उत्तम उदाहरण देतात, की जर एका बिनविषारी सापाने फुसफुसणे सोडले, तर लोक त्याला मारून टाकतील. त्यामुळे स्वत:ला वाचवण्यासाठी सापाला विषारी असल्याचा आव आणावा लागतो (नाटक करावे लागते). व्यवसायात आपल्या नियमांनुसार गोष्टी करण्यासाठी आणि स्वत:चा सन्मान टिकवण्यासाठी वेळ पडल्यास कडक होणे गरजेचे असते.

**५) नुकसानाच्या भीतीने घाबरू नका, त्यावर मात करा**

स्टार्टअपच्या जगात नेहमी सर्वकाही चांगलेच होईल असा विचार करणे मूर्खपणा आहे. व्यवसायात चढ–उतार होणे सामान्य आहे. कित्येक लोक नेहमी नुकसान होण्याच्या भीतीने आपली पावले मागे घेतात, जी सर्वात मोठी चूक आहे. चाणक्यांनी सांगितले आहे की, भीतीला स्वत:च्या मनात जागा देऊ नका; त्याऐवजी भीतीचा सामना करून ती कायमची संपवा. जर व्यवसायात नुकसान झाले तर निराश होऊन बसू नका. त्या चुकीमधून शिका, कुठे चूक झाली ते शोधा, भविष्यात ती चूक पुन्हा करू नका आणि तुम्ही पुढे जाऊन नक्कीच नफा कमावू शकता.

# रामेश्वर येथे घरफोडी; ६० हजारांचा ऐवज लंपास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील रामेश्वर येथे बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने ६० हजार रुपये किमतीचे सोन्या–चांदीचे दागिने व रोख रक्कम लंपास केली. ही घटना १७ जूनच्या रात्री ते १८ जूनदरम्यान घडली. या प्रकरणी संबंधित महिलेने गुरुवार, दि. १६ जुलै २०२६ रोजी उशिरा फिर्याद दिल्यानंतर अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कस्तुराबाई साहेबराव वंजारी (वय ६५, रा. रामेश्वर) या गावाबाहेर गेल्या असता चोरट्याने त्यांच्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील २० हजार रुपये किमतीची १० ग्रॅम वजनाची मंगळपोत, १० हजार रुपये किमतीची ५ ग्रॅम वजनाची सोन्याची अंगठी, २ हजार रुपये किमतीचे चांदीचे दागिने, २० हजार रुपये किमतीचे २० भार चांदीचे गोट तसेच ८ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ६० हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला.

याबद्दल अमळनेर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. हवालदार लक्ष्मीकांत शिंपी पुढील तपास करीत आहेत.

# वावडे येथील तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील वावडे येथील २१ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. या घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त होत आहे.

मुकेश लक्ष्मण पाटील (वय २१, रा. वावडे, ता. अमळनेर) याने राहत्या घराच्या छतावरील लोखंडी अँगलला दोरी बांधून गळफास घेतला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता.

याबाबत मारवड पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. पोलीस उपनिरीक्षक संजय पाटील तपास करीत आहेत.

# तुंबलेल्या पाण्यात पाय टाकताना सावधान; लेप्टोस्पायरोसिसचा धोका

## पावसाच्या साचलेल्या पाण्यातून जाणे टाळावे : पावसाळ्यात काळजी घेण्याचे आवाहन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : पावसाळ्यात अनेक शहरांमध्ये आणि रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचते. उंदीर, घुशी यांसारख्या प्राण्यांच्या मूत्रामधून 'लेप्टोस्पायरा' नावाचे घातक जीवाणू या पाण्यात मिसळतात, ज्यामुळे 'लेप्टोस्पायरोसिस' या गंभीर आजाराचा प्रसार होतो. त्यामुळे या साचलेल्या पाण्यातून चालणे आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक ठरू शकते. त्यामुळे दूषित पाण्यातून चालणे टाळावे किंवा चालताना काळजी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

जर तुमच्या पायाला लहानशी जखम असेल, त्वचा खरचटलेली असेल किंवा डोळे आणि तोंडावाटे या दूषित पाण्याचा संपर्क आल्यास हे जीवाणू थेट मानवी शरीरात प्रवेश करतात. सुरुवातीला हा आजार सामान्य वाटू शकतो; परंतु वेळेवर उपचार न मिळाल्यास यकृत आणि मूत्रपिंड निकामी होऊन काही गंभीर प्रकरणांमध्ये रुग्णाचा मृत्यू होण्याचा धोकाही संभवतो. त्यामुळे रस्त्यावरील पावसाच्या साचलेल्या पाण्यातून जाणे शक्यतोवर टाळावे आणि पाय उघडे असल्यास विशेष काळजी घेण्याची गरज निर्माण झाली आहे.

**जखम असल्यास अधिक खबरदारी आवश्यक**

जर तुमच्या पायाला किंवा हाताला कोणतीही लहानशी जखम असेल किंवा त्वचा खरचटलेली असेल, तर तिथून हे जीवाणू अतिशय वेगाने शरीरात शिरतात. अशा वेळी दूषित पाण्याचा संपर्क आल्यास



संसर्ग होण्याचा धोका कैक पटीने वाढतो. त्यामुळे जखम असल्यास साचलेल्या पाण्यापासून पूर्णपणे लांब राहावे आणि ती पट्टीने झाकून ठेवावी. तीव्र ताप येणे, डोकेदुखी, थंडी वाजणे आणि अंगदुखी ही या आजाराची प्राथमिक लक्षणे आहेत. उलट्या, आणि तीव्र थकवा जाणवणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे

**साचलेल्या पाण्यातून पायी जाणे धोकादायक**

पावसाळ्यात रस्त्यांवर आणि सखल भागात साचलेले पाणी अत्यंत दूषित असते, ज्यातून चालणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते. या पाण्यात अनेक प्रकारचे जंतू आणि प्राण्यांचे मलमूत्र मिसळलेले असते, जे थेट मानवी शरीरात प्रवेश करू शकतात. त्यामुळे अशा पाण्यातून पायी चालणे पूर्णपणे टाळले पाहिजे.

**लेप्टोस्पायरोसिसचे धोके काय?, काय काळजी घ्यावी?**

१) या आजाराचा संसर्ग वाढल्यास यकृत आणि मूत्रपिंड निकामी होण्याचा तसेच अंतर्गत रक्तस्राव होण्याचा मोठा धोका असतो

२) यापासून वाचण्यासाठी साचलेल्या पाण्यात जाणे टाळावे नाईलाज असल्यास गमबूट वापरावेत आणि पाय साबणाने स्वच्छ धुवावेत.

**पाण्यात मिसळतात अनेक घातक जीवजंतू**

साचलेल्या पाण्यात उंदीर, घुशी आणि इतर भटक्या प्राण्यांच्या लघवीवाटे 'लेप्टोस्पायरा'सारखे अतिसूक्ष्म व जीवघेणे जीवाणू मिसळतात. पाण्याच्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तीला सहज संक्रमित करू शकतात

**कशामुळे होतो हा आजार ?**

हा आजार मुख्यत्वे उंदरांच्या मूत्रामुळे दूषित झालेल्या पाण्याच्या किंवा ओल्या मातीच्या थेट संपर्कात आल्यामुळे होतो. मानवी शरीराची त्वचा, डोळे, नाक किंवा तोंडावाटे हे जीवाणू शरीरात प्रवेश करतात. विशेषत: साचलेल्या पाण्यातून अनवाणी किंवा उघड्या पायाने चालल्यामुळे या आजाराची बाधा होते.

### काय आहे लेप्टोस्पायरोसिस ?

लेप्टोस्पायरोसिस हा 'लेप्टोस्पायरा' नावाच्या जीवाणूमुळे होणारा एक तीव्र संसर्गजन्य आजार आहे, जो प्राण्यांकडून माणसांत पसरतो. हा आजार पावसाळ्यात दूषित पाण्याच्या संपर्कात आल्यामुळे प्रामुख्याने उद्भवतो. वेळेवर निदान न झाल्यास हा आजार अत्यंत गंभीर स्वरूप धारण करू शकतो.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com



# यूपीएससी मुलाखतीतील ‘तो’ प्रश्न ठरला टर्निंग पॉईंट!

## प्रिया राणीच्या हजरजवाबी उत्तराने पॅनल झाले थक्क; ‘आयएएस’ बनण्याचे स्वप्न पूर्ण



सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बिहारच्या प्रिया राणीने केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात ६९ वी रँक मिळवून आयएएस अधिकारी बनण्याचे आपले स्वप्न पूर्ण केले आहे. प्रतिकूल परिस्थितीवर मात करत आणि लाखो रुपयांच्या पॅकेजची कॉर्पोरेट नोकरी सोडून तिने मिळवलेले हे यश स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या देशभरातील लाखो तरुण-तरुणींसाठी कमालीचे प्रेरणादायी ठरत आहे. तिच्या या संपूर्ण यशाच्या प्रवासात मुलाखतीदरम्यान आलेला एक खास क्षण तिच्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला.

**आयटी क्षेत्रातील लठ्ठ पगाराची नोकरी सोडण्याचा धाडसी निर्णय**

प्रिया राणी ही बिहारमधील कुरकुरी या छोट्याशा गावातील रहिवासी आहे. गावात शिक्षणाच्या चांगल्या सोयी-सुविधा नसल्यामुळे तिच्या कुटुंबाने पाठिंबा देऊन तिला शिक्षणासाठी पाटण्याला पाठवले. पाटण्यात एका सामान्य भाड्याच्या घरात राहून तिने आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. पुढे रांचीच्या नामांकित बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मेसरा येथून तिने अभियांत्रिकीची पदवी घेतली. पदवीनंतर तिची बंगळुरू येथील एका नामांकित खाजगी कंपनीत चांगल्या पगाराची नोकरी लागली. मात्र, देशाची सेवा करण्याची आणि नागरी सेवेत जाण्याची तिची इच्छा स्वस्थ बसू देत नव्हती. अखेर अनेकांनी नाराजी व्यक्त करूनही तिने नोकरी सोडण्याचा अत्यंत धाडसी निर्णय घेतला आणि स्वतःला पूर्णपणे अभ्यासात झोकून दिले.

**अपयशाने खचली नाही; दररोज पहाटे ४ वाजता उठून अभ्यास**

प्रियाचा नागरी सेवेचा हा प्रवास प्रचंड चढ-उतारांचा राहिला. पहिल्याच प्रयत्नात अपयश आल्यानंतरही तिने हार मानली नाही. पहिल्या प्रयत्नातील अपयशानंतर दुसऱ्या प्रयत्नात तिला यश मिळाले आणि तिची भारतीय संरक्षण सेवेत निवड झाली. मात्र, आयएएस बनण्याचे मुख्य ध्येय असल्यामुळे तिने तिथेच न थांबता पुन्हा परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. तिसऱ्या प्रयत्नात पुन्हा अपयश आले, तरीही तिने स्वतःला खचू दिले नाही. तिने नव्या जोमाने दररोज पहाटे ४ वाजता उठून अभ्यासाला सुरुवात केली आणि अखेर चौथ्या प्रयत्नात ६९ वी रँक मिळवून आपले आयएएस बनण्याचे स्वप्न साकार केले.

**‘त्या’ एका उत्तराने मुलाखतीत मिळवून दिले १९३ गुण!**

प्रियाची मूलभूत संकल्पना अतिशय स्पष्ट असल्यामुळे तिने प्रत्येक वेळी पूर्व परीक्षा सहज उत्तीर्ण केली होती. मात्र, मुख्य परीक्षेनंतर तिची खरी चमक मुलाखतीदरम्यान दिसून आली. मुलाखत पॅनेलने प्रियाला एक अनपेक्षित प्रश्न विचारला होता की, ‘आम्ही तुम्हाला असा कोणता प्रश्न विचारला नाही, जो तुम्ही स्वतः विचारू इच्छिता?’ या अत्यंत गुगली प्रश्नावर प्रियाने अजिबात न डगमगता हसत उत्तर दिले. ती म्हणाली, ‘कदाचित तुम्ही मला माझी ओळख विचारू इच्छिता.’ तिच्या या अत्यंत समजूतदार आणि हजरजवाबी उत्तराने मुलाखत पॅनेलला कमालीचे प्रभावित केले. परिणामी, तिला मुलाखतीत तब्बल १९३ गुण मिळाले आणि तिने थेट ६९ व्या रँकसह यश संपादन केले.

**यशाचा कानमंत्र : ‘तुम्ही सुरूवात का केली, हे विसरू नका!’**

प्रिया राणी तिच्या या अभूतपूर्व यशाचे श्रेय चिकाटी आणि कठोर परिश्रमाला देते. भविष्यात नागरी सेवेत येऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना सल्ला देताना ती सांगते, की या खडतर प्रवासात नेहमी प्रेरित राहा, जमिनीशी जोडलेले राहा आणि आपण या प्रवासाची सुरुवात नेमकी का केली होती, हे ध्येय मनात कायम ठेवा. शिक्षण ही आपल्या आयुष्यातील सर्वात मोठी संपत्ती आहे, जी कोणीही आपल्याकडून हिरावून घेऊ शकत नाही.

# हॉटेलच्या रूममध्ये नोटपॅड, पेन का ठेवतात?

## ९० टक्के लोकांना माहितीच नाही त्याचा उपयोग



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हॉटेलच्या खोलीत नोटपॅड आणि पेन ठेवलेले असतात. मात्र, हॉटेलच्या रूममध्ये नोटपॅड, पेन का असतात हे बहुतांश जणांना माहितीच नसते. तुम्ही कदाचित प्रत्येक हॉटेलच्या खोलीतील डेस्कवर किंवा बेडशेजारील टेबलवर एक नोटपॅड आणि पेन ठेवलेले नक्कीच पाहिले असेल. बहुतांश पाहुणे याकडे फारसे लक्ष देत नसले, तरी हे साधे साहित्य केवळ मोफत मिळणारे स्टेशनरी साहित्य नसून त्यामागे अनेक विचारपूर्वक उद्देश आहेत. यांचा सर्वांत मोठा उपयोग पाहुण्यांना महत्त्वाची माहिती तातडीने लिहून ठेवण्यासाठी होतो. वाय-फाय पासवर्ड, खोलीचा क्रमांक, विमानाची वेळ, फोन नंबर, मीटिंगचे वेळापत्रक किंवा पत्ता असो, नोटपॅडमुळे ही आवश्यक माहिती नेहमी सहज उपलब्ध राहते.

हॉटेलमध्ये अनेकदा व्यावसायिक कामानिमित्त प्रवास करणारे लोक येत असतात. ज्यांना काम करत असताना मीटिंगच्या नोंदी घेण्यासाठी, सादरीकरणाची तयारी करण्यासाठी, कामांची यादी बनविण्यासाठी किंवा फोन कॉल दरम्यान स्मरणिका लिहिण्यासाठी सोयीस्कर जागेची गरज असते. पेन आणि नोटपॅड हे कोणत्याही डिजिटल उपकरणावर अवलंबून न राहता एक साधा पण प्रभावी कार्यक्षेत्र उपलब्ध करून देतात.

हस्तलिखित (हाताने लिहिलेले) संदेश सोडण्यासाठी देखील ही स्टेशनरी खूप उपयुक्त ठरते. पाहुणे याचा वापर कुटुंबातील सदस्यांशी, सोबतच्या प्रवाशांशी, हाऊसकीपिंग कर्मचाऱ्यांशी किंवा फ्रंट डेस्कशी संवाद साधण्यासाठी करू शकतात; विशेषतः जेव्हा एखादी व्यक्ती उपलब्ध नसते किंवा एखादी त्वरित आठवण करून देणारा संदेश ठेवायचा असतो.

अनेक प्रवासी त्यांच्या मुक्कामादरम्यान होणाऱ्या खर्चाचा हिशेब ठेवण्यासाठी या नोटपॅडचा वापर करतात. व्यावसायिक पाहुणे अनेकदा टॅक्सीचे भाडे, जेवणाचे बिल, टीप आणि इतर खरेदीची नोंद ठेवतात. ज्यामुळे पावत्या व्यवस्थित करणे आणि प्रवासानंतर खर्चाचा परतावा मिळविणे सोपे होते. हॉटेलच्या नोटपॅडमुळे पुढील प्रवासाचे नियोजन करणे सोपे होते. पाहुणे वारंवार प्रेक्षणीय स्थळांचे प्लॅन, रेस्टॉरंटच्या शिफारसी, खरेदीची यादी आणि दैनंदिन दिनक्रम लिहून ठेवतात. ज्यामुळे त्यांना नवीन ठिकाण फिरताना सर्व गोष्टींचे नियोजन करणे सोपे जाते.

हा नोटपॅड केवळ पाहुण्यांसाठीच उपयुक्त नाही, तर त्याचा हॉटेललाही फायदा होतो. बहुतांश नोटपॅडवर हॉटेलचा लोगो, संपर्क तपशील आणि ब्रँडिंग छापलेले असते. ज्यामुळे दैनंदिन वापराच्या या स्टेशनरी वस्तूचे रूपांतर एका सुबक विपणन साधनामध्ये होते, जे पाहुणे आठवण म्हणून आपल्या घरी देखील घेऊन जाऊ शकतात.

# कनेक्शन न घेता मिळेल एलपीजी सिलिंडर!

## पाहा कशी करावी लागेल बुकिंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तुमच्या घरात एलपीजी गॅस कनेक्शन नसेल तर आता तुम्हाला टेन्शन घेण्याची गरज नाही. कारण तुमच्या घरात विना गॅस कनेक्शन एलपीजी सिलिंडर मिळेल. आता तुम्ही विचार करत असाल, की अखेर हे कसे होईल. तर क्विक कॉमर्स प्लॅटफॉर्म इंस्टामार्टने हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेसनसह भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत आता देशातील पहिली ऑन डिमांड डिलिव्हरी सर्व्हिस सुरू होईल. म्हणजेच आता तुम्हाला घर बसल्या कोणत्याही गॅस कनेक्शनशिवाय एलपीजी गॅस सिलिंडर मिळेल. आता सर्वांत मोठा प्रश्न उपस्थित होतो, की अखेर याची बुकिंग कशी करावी लागेल. यासाठी काही डॉक्यूमेंटची गरज पडेल का? या सर्व प्रश्नांची उत्तर आपण जाणून घेऊया.

**विना गॅस कनेक्शनचे एलपीजी सिलिंडर कसे बुक होतील? :** एलपीजी गॅस सिलिंडर बुक करण्यासाठी तुम्हाला सर्वांत आधी केवायसी व्हेरिफिकेशन पूर्ण करावे लागेल. म्हणजेच एलपीजी डिलिव्हरीसाठी केवायसीशी संबंधित डॉक्यूमेंट पूर्ण करणे गरजेचे आहे. यानंतर ऑर्डर रिफिल मानली जाईल. यासह डिलिव्हरीवेळी रिकाम एलपीजी सिलिंडर देणेही गरजेचे आहे. इंस्टामार्टवर कंफर्म केलेल्या सर्व ऑर्डर एचपीसीएलच्या रजिस्टर्ड डिस्ट्रीब्यूटर्स नेटवर्थच्या माध्यमातून पूर्ण केल्या जातील.



**गॅस कनेक्शनची गरज नसेल? :** इंस्टामार्ट आणि एचपीसीएलच्या डीलमध्ये हिंदुस्तान पेट्रोलियमने HP Navya नावाच्या १० किलोग्रॅमचे कंपोझिट एलपीजी सिलिंडर लॉन्च केले आहे. या व्यतिरिक्त ग्राहक ५ किलोग्रॅमचे मेटल एलपीजी सिलिंडरही ऑर्डर करू शकतील. यामुळे नोकरी करणारे, विद्यार्थी आणि रेंटवर राहणाऱ्या लोकांनाही गॅस बुकिंग करणे सोपे जाईल. ही सर्व्हिस सध्या बेंगळुरूमध्ये सुरू केली आहे.

**गॅसची लेव्हलही दिसेल :** गॅस सिलिंडरच्या सुरक्षेसाठीही सेफ्टी स्टँडर्डचे पालन केले जाईल. मीडिया रिपोर्ट्सनुसार एचपीसीएलने माहिती दिली आहे, की HP Navya सिलिंडरला पारंपरिक स्टील सिलिंडरच्या हलक्या आणि रस्ट फ्री ऑप्शन म्हणून सादर करण्यात आले आहे. याची बॉडीही ट्रान्सपरेंट असेल. अशावेळी ग्राहकांना गॅसची लेव्हलही दिसेल. कंपनी म्हणते, की ही कॉम्पॅक्ट डिझाइन सर्व लहान कुटुंब आणि अशा घरांसाठी आहे, ज्यांना एक लहान सिलिंडर हवे आहे किंवा मग सेकंडरी सिलिंडर घ्यायचे आहे.

# ८० वर्षांपेक्षा अधिक काळ जगणारा जगातील सर्वांत सुंदर ‘नाजूक गुलाबी’ पोपट पाहिलाय का?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ऑस्ट्रेलियामध्ये एक असा पोपट आढळतो जो पक्षी प्रजातीमध्ये दीर्घायुषी ठरतो. याचे नाव म्हणजे ‘मेजर मिशेल्स कॉकटू’ हा जगातील सर्वांत सुंदर आणि आकर्षक पोपटांपैकी एक मानला जातो.

हा अत्यंत देखणा पक्षी प्रामुख्याने ऑस्ट्रेलियातील निम-ओसाड आणि अंतर्गत भागात आढळतो. जेथे त्याचे थवे झाडांवर आणि गवताळ प्रदेशात वावरताना दिसतात. या पक्ष्याचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या डोक्यावरील राजेशाही तुरा आहे, जो तो रागात किंवा आनंदात असताना उंचावतो. या तुऱ्यामध्ये गडद लाल आणि पिवळ्या रंगाचे पट्टे असतात. त्याच्या अंगावर पांढऱ्या रंगासोबतच अतिशय नाजूक गुलाबी रंगाची छटा असते. ज्यामुळे त्याला पक्षी विश्वातील ‘ब्यूटी क्वीन’ म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

हा पक्षी मानवी मानकानुसार दीर्घायुष्याचा विक्रम करतो. जंगलात तो साधारण ४० ते ५० वर्षे जगतो, तर मानवी देखरेखीखाली त्याचा आयुःकाल ६५ ते ८० वर्षांपेक्षा जास्त असू शकतो.

या प्रजातीमधील ‘किकी’ नावाचा एक कॉकटू शिकागोमधील प्राणिसंग्रहालयात तब्बल ८३ वर्षे जगला होता. ज्याची नोंद गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये जगातील सर्वांत जास्त जगणारा पोपट म्हणून झाली आहे.


मेजर मिशेल्स कॉकटू हे आयुष्यभरासाठी एकच जोडीदार निवडतात आणि जंगलात मोठ्या नीलगिरीच्या झाडांच्या ढोलीमध्ये आपली घरटी बनवून राहतात.

सध्या वाढते शहरीकरण आणि नैसर्गिक अधिवास नष्ट झाल्यामुळे या सुंदर पक्ष्याची संख्या वेगाने कमी होत असून, वन्यजीव कायद्यानुसार याला संरक्षित प्रजाती म्हणून घोषित करण्यात आले आहे.

# चावल बनाते समय करें ये छोटा काम

## हर दाना रहेगा अलग-अलग और खिला-खिला, जानिए टिप्स

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



दोपहर की थाली हो या रात का खाना, चावल हर भारतीय रसोई का अहम हिस्सा है। लेकिन कई बार सारी मेहनत के बाद भी चावल आपस में चिपक जाते हैं या गीले होकर अपना स्वाद खो देते हैं। अक्सर लोग समझते हैं कि सिर्फ महंगा चावल ही अच्छा बनता है, जबकि हकीकत यह है कि सही तरीका अपनाने से साधारण चावल भी शानदार बन सकते हैं।

रामपुर की ७० वर्षीय दादी चंद्रवती ने चावल पकाने के वे पुराने और कारगर तरीके साझा किए हैं, जो आज भी बड़े-बड़े शेफ इस्तेमाल करते हैं। दादी चंद्रवती बताती हैं कि चावल को सीधे पकाने की जल्दी कभी नहीं करनी चाहिए। सबसे पहले चावल को कम से कम तीन से चार बार साफ पानी से धोना जरूरी है। ऐसा करने से चावल के ऊपर लगा अतिरिक्त स्टार्च निकल जाता है, जो पकने के बाद उन्हें चिपचिपा बनाता है। जब धोने के बाद पानी साफ दिखने लगे, तभी समझें कि चावल पकाने के लिए तैयार हैं।

चावल धोने के बाद उन्हें १५ से २० मिनट के लिए पानी में भिगोकर छोड़ दें। भीगे हुए चावल पकते समय जल्दी फूलते हैं और दाने टूटते नहीं हैं। पकाते समय एक गहरे बर्तन में पर्याप्त पानी उबालें। जब पानी उबलने लगे, तब उसमें आधा छोटा चम्मच नमक और एक चम्मच घी डाल दें। घी डालने से दानों पर एक हल्की परत बन जाती है जिससे वे आपस में चिपकते नहीं और उनमें एक खास चमक आ जाती है।

चावल को हमेशा उबलते पानी में ही डालें और एक तेज उबाल आने के बाद गैस धीमी कर दें। तेज आंच पर चावल टूटने का डर रहता है, जबकि धीमी आंच पर इनका आकार बना रहता है।

करीब ८ से १० मिनट तक इन्हें खुला पकाएं। जब पानी सूख जाए और चावल नरम हो जाएं, तो गैस बंद करके उन्हें ५ मिनट के लिए ढककर छोड़ दें। यही वह समय है जब भाप चावल को अंदर तक पकाकर उसे असली ‘स्टीम राइस’ वाला स्वाद देती है।

अक्सर लोग चावल पकते ही उन्हें चम्मच से जोर-जोर से चलाने लगते हैं, जिससे दाने टूट जाते हैं। दादी ने सलाह दी है कि चावल को हमेशा कांटे की मदद से हल्के हाथों से चलाएं। इससे दाने अलग-अलग बने रहते हैं। अगर इन छोटी-छोटी बातों और सही समय का ध्यान रखा जाए, तो आपकी रसोई में बना साधारण चावल भी किसी होटल के शाही खाने जैसा स्वाद देगा।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरूम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोळा रोड, धुळे




# दररोज देवी भगवतींच्या ३२ नामांचा जप कसा कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात दुर्गा देवी यांना आद्य शक्ती आणि इच्छा पूर्ण करणारी देवी म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. पौराणिक कथेनुसार दुर्गा देवींनी महिषासुर या राक्षसाचा वध केला तेव्हा सर्व देवी-देवतांनी त्यांची पूजा केली. असे म्हणतात, की त्यावेळी सर्व देवी-देवतांनी दुर्गा देवी यांची आराधना केली आणि उपाय सांगण्यास सांगितले. पौराणिक मान्यतेनुसार दुर्गा देवी म्हणाल्या, की जो कोणी मोठ्या संकटांवेळी ३२ नावांच्या जपमाळ स्वरूपात मंत्राचा जप करेल, तो त्यांच्या सर्व समस्या दूर करेल. ज्योतिषांच्या मते दुर्गा सप्तशतीमध्ये दुर्गा देवींची ३२ नावे सांगितली गेली आहेत आणि ३२ नावांच्या माळाच्या रूपात मंत्रही जपला गेला आहे. ज्योतिषशास्त्रानुसार दुर्गा सप्तशतीमध्ये दुर्गा देवींच्या ३२ नावांचा जप कसा करायचा हे देखील सांगितले आहे.

दुर्गा सप्तशतीनुसार ज्या व्यक्तीवर मोठे संकट आले असेल त्यांनी दुर्गा देवींच्या ३२ नामांचे स्तोत्र एक हजार वेळा किंवा एक लाख वेळा पाठ करावे. या मंत्राचा जप करताना मध, तूप आणि पांढऱ्या तिळाच्या मिश्रणाने दुर्गा देवींच्या ३२ नामांचा मंत्र जप करावा, अशी मान्यता आहे.

**दुर्गा देवी यांच्या ३२ नावांचा मंत्र**

दुर्गा दुर्गार्तिशमनी दुर्गापद्विनिवारिणी।
दुर्गमच्छेदिनी दुर्गसाधिनी दुर्गनाशिनी ॥
दुर्गतोद्धारिणी दुर्गनिहन्त्री दुर्गमापहा।
दुर्गमज्ञानदा दुर्गदैत्यलोकदवानला ॥
दुर्गमा दुर्गमालोका दुर्गमात्मस्वरुपिणी ।
दुर्गमार्गप्रदा दुर्गमविद्या दुर्गमाश्रिता ॥
दुर्गमज्ञानसंस्थाना दुर्गमध्यानभासिनी ।
दुर्गमोहा दुर्गमगा दुर्गमार्थस्वरुपिणी ॥
दुर्गमासुरसंहन्त्री दुर्गमायुधधारिणी ।
दुर्गमाङ्गी दुर्गमता दुर्गम्या दुर्गमेश्वरी ॥
दुर्गभीमा दुर्गभामा दुर्गभा दुर्गदारिणी ।
नामावलिमिमां यस्तु दुर्गाया मम मानवः ॥
पठेत् सर्वभयान्मुक्तो भविष्यति न संशयः ॥

# जळगावचे मुधाई देवी मंदिर : इतिहास, स्थापत्यकला आणि श्रद्धेचा अद्वितीय संगम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुधाई देवी मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थान नव्हे, तर यादवकालीन स्थापत्यकला, शिल्पवैभव आणि खानदेशच्या समृद्ध इतिहासाचे जीवंत प्रतीक आहे. मंदिरातील अप्रतिम कोरीव काम, प्राचीन वास्तुरचना, भगवान विष्णू-माता लक्ष्मींची मूर्ती, मुधाई देवीचे स्थान आणि मंदिराच्या मूळ स्वरूपाबाबतचे संशोधन या सर्व गोष्टी इतिहासप्रेमी आणि भाविकांना आकर्षित करतात.

प्राचीन अहिरदेश म्हणजेच आजचा खानदेश प्रदेश हा इतिहास, संस्कृती आणि प्राचीन मंदिरांच्या वैभवाने समृद्ध आहे. या भूमीवर अनेक राजवंशांनी राज्य केले असून त्यांनी उभारलेल्या मंदिरांमधून तत्कालीन स्थापत्यकला, शिल्पकला आणि धार्मिक परंपरांचे दर्शन घडते. अशाच ऐतिहासिक वारशाचे जतन करणारे एक महत्त्वाचे मंदिर म्हणजे मुधाई देवी मंदिर. हे मंदिर जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर असलेल्या वाघळी गावाजवळ वसलेले आहे. गाव आकाराने लहान असले तरी त्याला समृद्ध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. गावाच्या अलीकडे एका छोट्याशा टेकडीवर हे प्राचीन मंदिर उभे असून, गावातच असलेल्या श्रीकृष्ण मंदिरातील तीन महत्त्वपूर्ण शिलालेखांमुळे वाघळीला विशेष ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या दोन्ही मंदिरांचे ऐतिहासिक मूल्य लक्षात घेऊन भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने (एएसआय) त्यांना संरक्षित स्मारकांचा दर्जा दिला आहे.

## यादवकालीन स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना

मुधाई देवी मंदिर काहीशा उंच टेकडीवर वसलेले असून आजही त्याच्या भव्यतेची साक्ष देत उभे आहे. कालौघात मंदिराची काही प्रमाणात पडझड झाली असली तरी त्यावरील अप्रतिम शिल्पकला आणि स्थापत्य वैशिष्ट्ये





आजही अभ्यासकांना आकर्षित करतात. पुरातत्त्व अभ्यासकांच्या मते हे मंदिर इ.स. ११५० ते १२०० या कालावधीत, म्हणजेच यादव राजवटीच्या काळात बांधण्यात आले असावे. यादवकालीन मंदिर स्थापत्यशैलीची अनेक वैशिष्ट्ये या मंदिरात स्पष्टपणे दिसून येतात. मंदिर पूर्वाभिमुख असून त्याची रचना अत्यंत सुबक आहे. यात अर्धमंडप, सभामंडप, अंतराळ आणि गर्भगृह असे प्रमुख भाग आहेत. या सर्व भागांची आखणी अत्यंत प्रमाणबद्ध असून तत्कालीन वास्तुकलेचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून या मंदिराकडे पाहिले जाते.

## अप्रतिम शिल्पकला

मंदिराच्या बाह्य भिंतींवर कोरलेल्या विविध देवतांच्या मूर्ती विशेष लक्ष वेधून घेतात. उत्तर बाजूस देवी चामुंडा तर पश्चिम बाजूस सूर्यदेव दक्षिण बाजूस श्री गणेश आहेत. या तिन्ही देवतांच्या स्थानक अवस्थेतील सुंदर प्रतिमा मंदिराच्या शिल्पवैभवात भर घालतात. सभामंडपातील खांब आणि छतावरील सूक्ष्म कोरीव काम विशेष उल्लेखनीय आहे. दगडावर केलेली नक्षीकामाची कलाकुसर यादवकालीन शिल्पकारांच्या अद्वितीय कौशल्याची साक्ष देते.

## गर्भगृहाचे वैशिष्ट्य

मंदिराच्या गर्भगृहाचे प्रवेशद्वार पाच शाखांनी बनलेले असून त्याला नंदिनी प्रकारची द्वारशाखा म्हटले जाते. द्वाराच्या ललाटबिंबाच्या वरच्या भागात नवग्रहांचे सुंदर अंकन करण्यात आले आहे. गर्भगृहात सध्या गरुडावर आरूढ असलेली भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांची सुंदर मूर्ती विराजमान आहे. त्याचबरोबर येथे मुधाई देवीचा तांदळा प्रतिष्ठापित करण्यात आलेला आहे, ज्याची स्थानिक भाविक मोठ्या श्रद्धेने पूजा करतात.

## हे मंदिर मूळचे सूर्यदेवाचे होते का?

मंदिराच्या स्थापत्याचा अभ्यास करणाऱ्या संशोधकांचे एक महत्त्वाचे मत असे आहे की हे मंदिर मूळत सूर्यदेवाला समर्पित असावे. यामागे काही कारणे सांगितली जातात. मंदिरावर सूर्यदेवाच्या प्रतिमा मोठ्या प्रमाणात आढळतात. अशी अनेक कारणे सांगितली जातात. पण काही अभ्यासकांच्या मते परकीय आक्रमणांच्या काळात मूळ सूर्यप्रतिमेचा विध्वंस होऊ नये म्हणून ती सुरक्षित स्थळी हलविण्यात आली असावी. मात्र नंतर ती पुन्हा या मंदिरात प्रतिष्ठापित करता आली नाही. त्यानंतर स्थानिक ग्रामस्थांनी येथे मुधाई देवीचा तांदळा स्थापित केला असावा. हा निष्कर्ष उपलब्ध स्थापत्य पुराव्यांच्या आधारे मांडला जात असला, तरी त्याबाबत निश्चित ऐतिहासिक पुरावा उपलब्ध नाही.

## वाघळीतील श्रीकृष्ण मंदिर आणि शिलालेख

वाघळी गावातील श्रीकृष्ण मंदिर देखील इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. या मंदिरात आढळणारे तीन भव्य शिलालेख तत्कालीन राजकीय, सामाजिक आणि धार्मिक जीवनावर प्रकाश टाकतात. त्यामुळे इतिहास संशोधक आणि पुरातत्त्व अभ्यासकांसाठी हे ठिकाण विशेष आकर्षणाचे केंद्र आहे.

## नवरात्रीची भव्य यात्रा

मुधाई देवी मंदिरात दरवर्षी शारदीय नवरात्री उत्साहात साजरी केली जाते. या काळात मोठी यात्रा भरते आणि जळगावसह खान्देशातील विविध भागांतून हजारो भाविक देवीच्या दर्शनासाठी येथे येतात. धार्मिक विधी, देवीची आरती, भजन-कीर्तन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे परिसर भक्तिमय वातावरणाने भारून जातो.

**कसे पोहोचाल?**

मुधाई देवी मंदिर जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावपासून सुमारे १२ किलोमीटर अंतरावर आहे. चाळीसगाव येथून वाघळीसाठी नियमित एसटी बस सेवा उपलब्ध आहे. भडगाव येथूनही वाघळीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस धावतात.

शांत, निसर्गरम्य वातावरणात वसलेले हे मंदिर अध्यात्म, इतिहास आणि स्थापत्यकलेचा सुंदर संगम अनुभवण्याची संधी देते. खानदेशातील हा ऐतिहासिक ठेवा प्रत्येक इतिहासप्रेमी आणि मंदिरप्रेमीने आयुष्यात किमान एकदा तरी आवर्जून पाहावा, असेच म्हणावे लागेल.

# आषाढ गुप्त नवरात्रोत्सव सुरू; दुर्गादेवींच्या अदृश्य रूपांची पूजा

## नऊ दिवस शाश्वत ज्योत प्रज्वलित करण्याला विशेष महत्त्व

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आषाढ गुप्त नवरात्रीची सुरूवात बुधवार, १५ जुलै २०२६ पासून झाली. या नऊ दिवसांमध्ये देवी दुर्गेच्या अदृश्य रूपांची पूजा केली जाते. नवरात्रीत शाश्वत ज्योत प्रज्वलित करण्याला देखील महत्त्व आहे. नवरात्रीमध्ये ज्योत अखंड प्रज्वलित ठेवण्याचे महत्त्व आणि नियम जाणून घेऊया. या नऊ दिवसांत तंत्र-मंत्रांचा अभ्यास, शक्तीची उपासना आणि देवी दुर्गेच्या नऊ रूपांची पूजा-अर्चा करण्यासाठी गुप्त नवरात्रीला विशेष महत्त्व आहे. गुप्त नवरात्रीदरम्यान देवी दुर्गेच्या दहा महाविद्यांची पूजा केली जाते. या काळात भक्त नऊ दिवस उपवास करतात, आपल्या इच्छापूर्ती व आध्यात्मिक प्रगतीसाठी प्रार्थना करतात, विधीपूर्वक देवीची पूजा करतात. अनेक भक्त या नऊ दिवसांत देवी दुर्गेसमोर अखंड ज्योत प्रज्वलित करतात, जे अत्यंत शुभ आणि फायदेशीर मानले जाते. श्रद्धेनुसार नवरात्रीत अखंड दिवा लावल्याने देवीचा आशीर्वाद मिळतो आणि सर्व संकटे दूर होतात.



### अखंड दिवा लावण्याचे महत्त्व

धार्मिक श्रद्धेनुसार अखंड ज्योत ही देवी शक्तीचे निरंतर अस्तित्व, ज्ञान, सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धीचे प्रतीक आहे. असे म्हटले जाते, की नवरात्रीत सतत तेवत असलेला दिवा घराचे वातावरण शुद्ध करतो आणि नकारात्मक शक्तींचा प्रभाव कमी करतो. भक्तीभावाने आणि नियमितपणे अखंड ज्योत प्रज्वलित केल्याने देवी दुर्गेचा विशेष आशीर्वाद प्राप्त होतो. ज्यामुळे कुटुंबात सुख, शांती, आरोग्य आणि समृद्धी येते.

### आषाढ नवरात्रीची सुरूवात कधी होत आहे आणि कधी संपणार

यावर्षी आषाढ महिन्यातील गुप्त नवरात्रीची समाप्ती बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी होईल. यावेळी गुप्त नवरात्रीच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशीची पूजा शुक्रवार, १७ जुलै २०२६ रोजी होईल. गुप्त नवरात्री म्हणजे दुर्गा देवीच्या दहा महाविद्यांची पूजा करण्याचा विधी. या महाविद्यांमध्ये देवी काली, देवी तारा, देवी त्रिपुरा सुंदरी, देवी भुवनेश्वरी, देवी चिन्नमस्ता, देवी त्रिपुरा भैरवी, देवी धुमावती, देवी बगलामुखी, देवी मातंगी आणि देवी कमला यांचा समावेश होतो.


### अखंड दिवा लावण्याचे नियम

नवरात्रीत दिवा लावण्यापूर्वी देवघर पूर्णपणे स्वच्छ करावे. दिवा पूर्वेकडे किंवा ईशान्य दिशेला तोंड करून ठेवणे शुभ मानले जाते. ज्योतीसाठी शुद्ध तूप किंवा तिळाचे तेल वापरता येते. जर तुपाचा दिवा लावत असाल, तर दिवा सतत जळत राहावा यासाठी त्यात एक स्वच्छ आणि पुरेशी लांब कापसाची वात ठेवावी. एकदा प्रज्वलित झाल्यावर ही शाश्वत ज्योत नऊ दिवस विझवू नये. म्हणून वेळोवेळी तूप किंवा तेल घालावे आणि वातीची काळजी घ्यावी. दिवा जोरदार वाऱ्यापासून आणि अपघाताच्या शक्यतेपासून दूर, सुरक्षित ठिकाणी ठेवावा. कोणत्याही कारणाने दिवा विझल्यास घाबरून न जाता स्नान करावे, आदरपूर्वक आदिशक्तीची क्षमा मागावी आणि सांगितलेल्या विधींनुसार दिवा पुन्हा प्रज्वलित करावा.

पूजेदरम्यान दररोज दुर्गा सप्तशती, देवी कवच, सिद्ध कुंजिका स्तोत्र किंवा देवी दुर्गाच्या मंत्रांचे पठण करणे शुभ मानले जाते. तसेच कठोर आहार, संयमी आचरण, सत्यनिष्ठा आणि स्वच्छतेचे पालन करण्याचा सल्ला दिला जातो.

# तुळजा भवानीच्या शक्तिरूपांचे विराट दर्शन!

## अनुभवा दिव्य स्वस्तिकाचा निर्णायक जुलै महिना





**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'आई तुळजाभवानी' या एका वाहिनीवरील लोकप्रिय मालिकेत प्रेक्षकांना आता देवीच्या अलौकिक शक्तिरूपांचे विराट दर्शन घडणार आहे. निर्जला एकादशीपासून आषाढी एकादशीपर्यंतच्या पवित्र काळात मालिकेत 'दिव्य स्वस्तिकाचा निर्णायक जुलै महिना' हा विशेष अध्याय सादर केला जाणार आहे. या काळात देवी तुळजाभवानी पाताळदेवीने रचलेल्या भयंकर कारस्थानाचा सामना करत मानवजातीचे रक्षण करताना दिसणार आहे.

मालिकेच्या कथेनुसार भूलोकावर भक्तीचा चातुर्मास सुरू होऊ नये यासाठी पाताळदेवीने अकालमृत्यू, भय, चिंता आणि व्यसन या चार विकारांच्या माध्यमातून विनाशकारी संकट निर्माण केले आहे. या संकटाचा निपात करण्यासाठी आदिमाया स्वतः सज्ज होते आणि देवी तुळजाभवानी चार वेगवेगळ्या दिव्य रूपांमध्ये अवतार धारण करते. या प्रत्येक रूपातून ती केवळ दुष्ट शक्तींचा नाश करत नाही, तर संकटांशी लढण्याचा आध्यात्मिक संदेश आणि जीवन जगण्याची प्रेरणाही देते.

या विशेष कथानकात एका शेतकरी कुटुंबातील चार भावांची कथा केंद्रस्थानी आहे. या चार भावांच्या आयुष्यात आलेल्या संकटांमधून देवी त्यांना कशी मुक्त करते आणि मानवजातीला कोणता बोध देते, हे मालिकेत दाखवले जाणार आहे. या प्रवासात भक्तांना आध्यात्मिक अनुभूतीसोबतच जीवनातील संकटांवर मात करण्याची प्रेरणादायी शिकवण मिळणार आहे.

सध्या ब्रह्मांडात तयार झालेले अंधुक 'दिव्य स्वस्तिक' हे या कथानकाचे महत्त्वाचे प्रतीक आहे. मृत्यूहारिणी, भयतारिणी, चिंतानाशिनी आणि व्यसनखंडिनी या चार शक्तिरूपांत देवी प्रत्येक विकारावर विजय मिळवत जाईल, तसे हे स्वस्तिक अधिक तेजस्वी होत जाईल. मात्र हा प्रवास अत्यंत आव्हानात्मक असणार असून प्रत्येक विकाराशी निर्णायक संघर्ष रंगणार आहे.

या महासंग्रामातून देवी चारही भावांना कशी संकटमुक्त करेल, दिव्य स्वस्तिक पूर्णपणे कसे उजळेल आणि मंगलमय चातुर्मासाची सरूवात कशी होईल, याची उत्कंठा आता प्रेक्षकांमध्ये वाढली आहे. मालिकेतील हा नवा अध्याय भक्ती, अध्यात्म आणि दैवी शक्तींचा संगम अनुभवण्याची संधी देणार आहे. 'दिव्य स्वस्तिकाचा निर्णायक जुलै महिना' हा विशेष भाग दररोज रात्री ८:५० वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार असून, देवी तुळजाभवानीच्या चार अलौकिक शक्तिरूपांचे विराट दर्शन आणि त्यामागील आध्यात्मिक संदेश अनुभवण्याची संधी प्रेक्षकांना मिळणार आहे.

# चामुंडेश्वरी देवीचा काय आहे महिमा?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चामुंडेश्वरी देवी ही आदिशक्तीचे उग्र, पराक्रमी आणि भक्तवत्सल स्वरूप मानली जाते. चंड-मुंड आणि महिषासुर यांसारख्या असुरांचा संहार करून धर्माचे रक्षण करणाऱ्या या देवीची भारतभर मोठ्या श्रद्धेने पूजा केली जाते. कर्नाटकातील म्हैसूरच्या चामुंडी टेकडीवरील चामुंडेश्वरी मंदिराविषयी पौराणिक कथा जाणून घेऊया.

दक्षिण भारतातील कर्नाटकमधील म्हैसूर (मैसूर) शहराजवळील चामुंडी टेकडीवर वसलेले श्री चामुंडेश्वरी देवीचे मंदिर हे देशातील प्रसिद्ध शक्तिस्थळांपैकी एक मानले जाते. देवी दुर्गेचे उग्र आणि शक्तिशाली स्वरूप असलेल्या चामुंडेश्वरी देवीचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी लाखो भाविक येथे येतात. देवीने महिषासुराचा वध करून धर्माचे रक्षण केले, अशी पौराणिक श्रद्धा आहे.

देवीने चंड आणि मुंड या असुरांचा वध केल्यामुळे तिला 'चामुंडा' हे नाव प्राप्त झाले. चामुंडेश्वरी देवी ही आदिशक्तीचे अत्यंत उग्र आणि शक्तिशाली रूप मानले जाते. देवीच्या दुर्गेच्या भाव शक्तीपैकी एक असलेल्या चामुंडेश्वरी देवीची पूजा भारतातील अनेक भागांमध्ये केली जाते. विशेषतः कर्नाटकातील म्हैसूरच्या चामुंडी टेकडीवरील चामुंडेश्वरी देवीचे मंदिर प्रसिद्ध आहे. देवीने चंड आणि मुंड या दोन असुरांचा वध केला त्यामुळे तिला चामुंडा असे नाव मिळाले. यापुढे तिच पूजनीय रूप चामुंडेश्वरी म्हणून ओळखले जाऊ लागले.

### चामुंडेश्वरी देवीची पौराणिक कथा

यामागील पौराणिक कथा अशी, की देवी महात्म्याचा शुंभ निशुंभ या असुराच्या संज्ञात चंड आणि मुंड हे बलवान सेनापती होते. युद्धादरम्यान देवीच्या क्रोधातून एक उग्र शक्ती प्रकट झाली. तिने चंड आणि मुंड यांचा वध करून त्यांची मत्सके देवीसमोर अर्पण केली. तेव्हा देवीने तिला



चामुंडा असं नाव दिलं. यानंतर देवीने महिषासुराचाही पराभव केला म्हणूनच म्हैसूर परिसरात चामुंडेश्वरीला महिषासूरमर्दिनी म्हणूनही विशेष मान आहे. चामुंडेश्वरी देवीचा रंग गडद असून तिच्या हातामध्ये त्रिशूळ, तलवार, डमरू, ढाल, पाश इत्यादी आयुध आहेत. गळ्यात गंधमाळा आहेत. सिंह हे देवीचे वाहन आहे. उग्र रुप असले तरी भक्तांवर कृपा करणारी आणि रक्षण करणारी ही मातृशक्ती आहे. भय, संकट आणि नकारात्मक शक्तींपासून संरक्षण मिळावे म्हणून तिची उपासना केली जाते. शत्रूंचा पराभव, धैर्य, आत्मविश्वास आणि मानसिक बळ मिळाव म्हणून देवीची आराधना करतात. तांत्रिक साधना आणि शक्ती उपासनेतही चामुंडेश्वरीला विशेष स्थान आहे.

### चामुंडेश्वर देवीचे सर्वांत प्रसिद्ध मंदिर

चामुंडेश्वर देवीचे सर्वांत प्रसिद्ध मंदिर चांमुडेश्वर हिल्स हे म्हैसूर येथील असलेले चामुंडेश्वर मंदिर हे सुमारे एक हजार उंच टेकडीवर आहे. येथे दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. विशेषतः दसरा उत्सवात या मंदिराचे धार्मिक महत्त्व अधिक वाढते.

### विविध ठिकाणांतील देवीचे मंदिर

मुंबईतील भायखळा परिसरात चामुंडाय देवीचे एक जुने मंदिर आहे. दक्षिण भारतीय आणि मराठी भाविक येथे मोठ्या श्रद्धेने दर्शनासाठी येतात. तर मुंबईतील दहिसर पूर्व येथे शनी आणि चामुंडाय देवी यांचे एक संयुक्त मंदिर आहे. मंगळवार, शुक्रवार आणि नवरात्रात येथे भक्तांची फार मोठी गर्दी असते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही चामुंडेश्वरी देवीचे एक प्रसिद्ध स्थान आहे. कोकणातील ग्रामदैवतांपैकी हे एक भक्तांचे श्रद्धास्थान मानले जाते. येथे वार्षिक यात्रा आणि धार्मिक उत्सव मोठ्या उत्साहात साजरे होतात. सांगली जिल्ह्यातील आटपाडी येथे चौंडेश्वरी देवीचे मंदिर आहे. सांगली परंपरेत चौंडेश्वरी हे चामुंडेश्वरीचे एक रूप मानले जाते आणि देवीला ग्रामसंरक्षिका म्हणून पूजले जाते. मंगळवार, शुक्रवार आणि नवरात्र हे देवीच्या उपासनेसाठी विशेष दिवस मानले जातात. लाल फूल, कुंकू, हळद, नारळ आणि फळांचा नैवेद्य या देवीला अर्पण केला जातो. देवीच्या कृपेसाठी दुर्गासप्तशतीमधील 'देवी कवच' आणि 'अर्गला स्तोत्र' आणि चामुंडा स्तोत्राचे पठण केले जाते.

**(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)**